ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# ग्रामसभेतून ग्रामविकासाला चालना : एक विश्लेषणात्मक अध्ययन

**(विशेष संदर्भ : ता. चोपडा, जि. जळगाव)**

प्रा. रायपुरे विनोद अजाबराव
प्रा. गुजराथी आशिष सुभाषलाल

**Abstract (सारांश)**

आंतरराष्ट्रीय स्तरावर युनोची सभा, राष्ट्रीय पातळीवर संसद व राज्य पातळीवर विधानसभा याप्रमाणे स्थानिक पातळीवर पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामसभा सर्वोच्च यंत्रणा आहे. ग्रामपातळीवर प्रत्यक्ष लोकशाहीचा अविष्कार म्हणून ग्रामसभेकडे पाहिले जाते. 73 व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज व्यवस्थेमध्ीील ग्रामपंचायत ही गाव स्तरावर कार्यरत लोकशाही संस्था असून गावातील प्रत्यक्ष गावाच्या कारभारात सहभागाची संधी देणारी ग्रामसभा आहे. ग्रामविकासातील ग्रामसभेच्या माध्यमातून लोक सहभागाचे महत्त्व लक्षात घेता ग्रामसभा हे जनतेचे प्रत्यक्ष प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे याची जाणीव सर्वसामान्य जनतेला झाल्यामुळे आणि जनतेचा राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रक्रियेत सहभाग वाढल्यामुळे गावाचा विकास घडवून आणणे शक्य झाले असल्याचे दिसते.

सदर संशोधन पेपरमध्ये जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील एकुण 27 ग्रामपंचायतींच्या अभ्यासातून ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभा महत्त्वाची आहे काय? गावातील लोक हे ग्रामसभेविषयी कितपत समाधानी आहेत व ग्रामसभा विकास योजना राबविण्यात मदत करते काय? याविषयी चर्चा केली असून ग्रामसभेच्या माध्यमातून जवळजवळ सर्वच सदस्यांची सकारात्मकता दिसून येते, या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**Key Word (मुख्य शब्द)** — ग्रामीण विकास, ग्रामसभा, सहभाग

**प्रस्तावना (Introduction) :**

महात्मा गांधींच्या विचारात ग्रामीण विकास हे एक आधुनिक भारताचे स्वप्न होते, त्यासाठी शासानाने विविध कमिट्यांची स्थापना करून ग्रामीण विकास योजाना अंमलात आणल्या होत्या परंतु त्यास ज्या प्रमाणात हवे तसे यश मिळाले नाही. याचा सारासार विचार व कार्यक्रमाचा पूर्ण विचार करण्यासाठी केंद्र शासानाने 1957 साली बलवंतराय मेहता समिती नेमली, या समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पनेचे महत्त्व पटवून देत विविध शिफारशी केल्या. या शिफारशीमुळे ग्रामीण विकासास चालना मिळेल या अनुषंगाने भारत सरकारने 1958 साली याचा स्वीकार केला. त्यानुसार सर्वप्रथम राजस्थान राज्यात लोकशाही विकेंद्रीकरणासाठी संकल्पना प्रत्यक्षात आणली. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी 2 ऑक्टोबर 1959 रोजी प्रत्यक्ष उद्घाटन करताना या प्रशासनाचे पंचायतराज असे नामकरण केले. अशा रितीने विविध समित्यांच्या अथक परिश्रमातून भारतात 1) केंद्र शासन 2) राज्य शासन व 3) स्थानिक स्वराज्य संस्था या त्रिस्तरीय प्रशासन व्यवस्था निर्माण करून विकासाच्या दृष्टिने वाटचाल सुरू झाली. यात पंचायत व्यवस्थेचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था असे दोन स्तर असून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत जिल्हास्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती व ग्रामस्तरावर ग्रामपंचायत व्यवस्था निर्माण केली. भारतामध्ये जिल्हा परिषद 659, पंचायत समिती 6829 व ग्रामपंचायत 255444 इतक्या आहेत.

महाराष्ट्रात वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम 1961 मध्ये लागू करून कामकाजात घटानात्मक सुसूत्रता नवती तसेच विविध त्रुटी दिसत होत्या. या अनुषंगाने ग्रामपंचायतीची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊन सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा फायदा व परिणाम होण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासानाने बोंगिरवार समिती नेमली, या समितीच्या शिफारशीनुसार प्रत्येक जिल्ह्यात, जिल्हा नियोजन व विकास मंडळ स्थापन करण्यात आले. तर 1984 मध्ये केंद्रसरकारच्या योजनांचे व पंचायतराज मूल्यमापानासाठी पी. बी. पाटील समिती स्थापन करण्यात आली. या बदला नंतर पुढे 24 एप्रिल 1993 रोजी 73 वी घटानादुरुस्ती अंमलात आली, त्यातूनच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या कार्यात आमूलाग्र बदल झाला व त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. पंचायतराज संस्थेत जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांच्या स्वउत्पन्नाच्या योजना, राज्य सरकारने हस्तांतरीत केलेल्या योजाना, अभिकरण तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या योजना व केंद्र शासन पुरस्कृत योजना, या सर्व योजना मिळून एकंदरीत 360 आहेत. या पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण भागाच्या मोठ्या प्रमाणात विकासास चालना मिळण्यास मदत झाली आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात स्थानिक शासन संस्थेची आकडेवारीचे अवलोकन करता

जवळपास भारतात 28813 ग्रामपंचायती आहेत.

ग्रामसभेच्या माध्यमातून गावाच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी आराखडा तयार करून शासनाच्या नियमाप्रमाणे अंमलात आणण्यासाठीचे अधिकार गावकऱ्यांना प्राप्त झाले आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासाची चर्चा संसदेप्रमाणे गावातच ग्रामसभेत करून निर्णय घेता येतात. त्याचप्रमाणे काटकसर, कार्यक्षमता, खर्च, भ्रष्टाचार यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ग्रामसभा महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळाली आहे. थोडक्यात ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका व जनतेचा निर्णय प्रक्रियेत सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्रात अशी अनेक उदाहरणे आहेत ज्याद्वारे ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभा महत्त्वाची ठरली आहे. ती प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यातील हिवरेबाजार व पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी, जालना–खासगाव, औरंगाबाद – पाटोदा, चंद्रपूर – राजगड, पुणे – भागडी, लातूर – दवाणगाव, औरंगाबाद – पोखरी इत्यादी. यावरून असे निदर्शनास येते की, प्रामुख्याने ग्रामसभा सक्षम करण्यास गावातील लोकांचा सक्रिय सहभाग व एकत्रित निर्णय यामुळे विकास शक्य आहे. परंतु असाच विकास महाराष्ट्रात इतरत्र जिल्ह्यात तथा गावात दिसून येतो का? अर्थात उपरोक्त चित्र सार्वत्रक म्हणता येणार नाही. कारण आजही अनेक ठिकाणी ग्रामसभा फक्त कागदावरच होत आहेत. काही ठिकाणी उपस्थिती फारशी नसते, तरीदेखील नंतर सह्या घेवून कोरम फुल्ल असल्याचे सांगितले जाते किंवा कोरम अभावी सभा तहकूब करून मूठभरांच्या उपस्थितीत सभा घेतली जाते. ग्रामसभेच्या माध्यमातू ग्रामीण विकासाला कितपत हातभार लागला हे शोधण्याचा व त्यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने सदर पेपरमध्ये प्रयत्न केला आहे.

**उद्देश (Objective) :**

ग्रामसभा ग्रामीण विकासाकरीता महत्त्वाची आहे हे अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधानत जळगाव जिल्ह्यातील एकुण 15 तालुक्यातील एकुण 117 गावांच्या अंतर्गत येणाऱ्या 90 ग्रामपंचायतींपैकी संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा वापर करून 27 ग्रामपंचायतींची निवड केली व या 27 ग्रामपंचायती मधून प्रत्येकी 10 उत्तरदात्यांची सहेतूक पद्धतीने निवड केली. अशा एकुण 270 उत्तरदात्यांची निवड करण्यात आली व संशोधानाच्या प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील मुलाखत आनुसूचीद्वारे तसेच निरीक्षणाद्वारे तथ्य संकलीत करण्यात आले.

तथ्य संकलन केल्यावर व त्यावर SPSS द्वारे प्रक्रिया करून सारण्यांद्वारे संकलीत तथ्यांचे विश्लेषण करून त्याद्वारे निष्कर्ष मांडण्यात आले. सदर संशोधानत दुय्यम तथ्यांचे संकलन सरकारी दस्तऐवज व प्रकाशित सामुग्री तसेच इंटरनेटवरील विविध संकेत स्थळांद्वारे संकलीत करण्यात आले.

सारणी क्र. 1

ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या विकास योजना कार्यक्रम राबविण्यास मदत करते काय? ग्रामसभेत पारित निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत का ?
Cross tabulation

| ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या विकास योजना कार्यक्रम राबविण्यास मदत करते काय | ग्रमसभेत पारित निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का | | | |
|---|---|---|---|---|
| | नेहमीच | कधीकधी | कधीच नाही | एकूण |
| असहमत | 20 | 26 | 38 | 84 |
| | 23.8% | 31.0% | 42.2% | 100.0% |
| | 7.4% | 9.6% | 14.1% | 31.1% |
| सहमत | 20 | 95 | 71 | 186 |
| | 10.8% | 51.1% | 38.2% | 100.0% |
| | 7.4% | 35.2% | 26.3% | 68.9% |
| एकूण | 40 | 121 | 109 | 270 |
| | 14.8% | 44.8% | 40.4% | 100.0% |
| | 14.8% | 44.8% | 40.4% | 100.0% |

($X^2$=12.603, df =2, C.C.=0.211, N = 270, $P < 0.05$)

**ग्रामसभेतून ग्राम विकासाला चालना :**

ग्रामसभेच्या माध्यमातून ज्या विविध विकासकारी कामांना चालाना मिळते व त्यातून ग्रामीण विकासाला निश्चितच चालना मिळत असते. सदर संशोधानात ग्राम सदस्यांनी ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभा ज्या ग्रामपंचायतीच्या विकास योजना आहेत त्या राबविण्यास मदत करण्याविषयी मत मांडले तसेच ते खालील सारणीवरून दिसून येते.

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या ज्या विकास योजना कार्यक्रम आहेत त्याकरीता मदत करते या मताशी जवळजवळ 68% सदस्य आहेत म्हणजेच ग्रामीण विकासाकरीता जे कार्यक्रम आहेत ते राबविण्याकरीता कोणत्याच प्रकारचा विरोध ग्रामसभेत होत नाही असे म्हणता येईल. तसेच ग्रामसभेत जे निर्णय पारीत होतात त्या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी विषयी सुद्धा जवळ जवळ तवेढीच दिसून येते.

**सारणी क्र. 2**

ग्रामसभा ग्रामीण विकासाकरिता महत्त्वाचे आहे का* आपण आपल्या □ावातील ग्रामसभेविषयी समाधानी आहेत का
Cross tabulation

| ग्रामसभा ग्रामीण विकासाकरिता महत्त्वाचे आहे का | आपण आपल्या □ावातील ग्रामसभेविषयी समाधानी आहेत का | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | होय | नाही | सां□ता येत नाही | |
| सहमत | 5 | 5 | 10 | 20 |
| | 20.0% | 25.0% | 50.0% | 100.0% |
| | 1.9% | 1.9% | 3.7% | 7.4% |
| असहमत | 15 | 11 | 0 | 26 |
| | 57.7% | 42.3% | 0.0% | 100.0% |
| | 5.6% | 4.1% | 0.0% | 9.6% |
| पूर्णतः सहमत | 43 | 86 | 45 | 174 |
| | 24.7% | 49.4% | 25.9% | 100.0% |
| | 15.9% | 31.9% | 16.7% | 64.4% |
| पूर्णतः असहमत | 11 | 16 | 23 | 50 |
| | 22.0% | 32.0% | 46.0% | 100.0% |
| | 4.1% | 5.9% | 8.5% | 18.5% |
| एकूण | 74 | 118 | 78 | 270 |
| | 27.4% | 43.7% | 28.9% | 100.0% |
| | 27.4% | 43.7% | 28.9% | 100.0% |

{x2=54.436, DF=16, C.C.=0.813, N=270, P<0.05}

ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभेचे महत्त्व ग्रामसदस्यांना असल्या विषयीचे मत व गावात ग्रामसभेच्या विषयी समाधान असण्याविषयीचे मत खालील सारणीवरून दिसून येते.

ग्रामसभा ग्रामीण विकासाकरिता महत्त्वाचे आहे का' आपण आपल्या गावातील ग्रामसभेविषयी समाधानी आहेत का

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, ग्रामसभेच्या जवळजवळ 64.4% सदस्य ग्रामसभा ही ग्राम विकासाकरीता महत्त्वाची आहे अशा प्रकारचे मत व्यक्त करतात. त्यामुळे असे म्हणता येईल की, ग्रामसभेच्या सदस्यांना ग्रामसभेचे महत्त्व हे पटलेले आहे. कारण ग्रामीण विकास करावयाचा झाल्यास ग्रामसभा अत्यंत प्रभावी माध्यम आहे याची जाणीव आहे.

गावातील ग्रामसभा तेव्हाच यशस्वी होते जेव्हा ग्रामसभेविषयी सभासद हे समाधानी आहेत काय असे विचारले असता ते समाधानी दिसून येत नाहीत.

**सारांश**

ग्रामसभा ही गावाच्या विकासाकरीता प्रयत्नशील असते. सदर संशोधान पेपर मध्ये चोपडा तालुक्यातील 27 ग्रामपंचायतीं अंतर्गत येणाऱ्या ग्रामसदस्यांच्या अध्ययनातून ग्रामसभा ग्रामविकासास चालना देते काय याविषयी विश्लेषण करण्यात आले आहे.

अध्ययनात असे दिसून आले की, ग्रामसभा ज्या विकास योजना राबवित आहे त्याकरीता ग्रामसभा संपूर्ण मदत करते व या संदर्भात कोणत्याच प्रकारचा विरोध दिसून येत नाही ही सकारात्मक बाब आहे. यासोबतच जे ही निर्णय ग्रामसभेत पारित होतात त्यांच्या अंमलबजावणीत सुद्धा ग्रामसभा मदत करते. त्यामुळे ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभेचे ग्रामीण विकासास चालना दिसून येते. ग्रामसदस्यांना ग्रामसभेचे महत्त्व दिसून येते. यावरून ग्रामीण विकासाकरीता ग्रामसभा अत्यंत प्रभावी माध्यम आहे याची जाणीव आहे.

ग्रामविकास साधावयाचा झाल्यास ग्रामसभेच्या माध्यमातून त्याला चालना मिळते असे दिसून येते. म्हणून असे म्हणता येईल की, ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामविकासाला चालना मिळते.

*संदर्भ : (BibliographY)*


1) *मेहता बळवंतराय (1957), रिपोर्ट ऑफ दि वर्किंग ऑफ द कम्युनिटी प्रोजेक्ट अँड नॅशनल एक्सटेंशन सर्व्हिस.*

2) *पाटील वा. भा. (1999), पंचायती राज्य, विद्या प्रकाशन, नागपूर*

3) *आगलावे प्रदीप (2000), संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर*

4) *भोगले शांताराम (1990), भारतातील स्थानिक प्रशासन, विद्या प्रकाशन, नागपूर*

5) *आवळे मनोज (2003), पंचायत राज–कार्य–कायदा योजना, अनुबंध प्रकाशन, पुणे*

6) *नांदेडकर व्ही. जी. (2006), पंचखयतीराज एक विश्लेषणात्मक परमार्थ, के. सागर पब्लिकेशन, पुणे.*

7) *https://www-maharashtra-gov-in/1125/Home*

8) *https://inflibnet-ac-in/*

9) *https://rdd-maharashtra-gov-in/sites/default/files vikasachiVatchal-pdf*

10) *https://cdn1-byjus-com/wp&content/uploads/2020/01/Maharashtra&Board&Class&6 Civics&*

11) ttps://www-mahapanchayat-gov-in/hidden/&

12) https://panchayatmahiti-blogspot-com/